**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०९ ऑगस्ट २०२६**

**ठळक बातम्या**

1. **भारत छोडो आंदोलनाच्या ८४व्या वर्धापन दिनानिमित्त देशाचं हुतात्म्यांना अभिवादन.**
2. **देशभरात आजपासून 'हर घर तिरंगा' अभियानाला सुरुवात.**
3. **मंडल यात्रेचा चंद्रपूर इथं समारोप; ओबीसींची संख्या कमी दाखवून समाजाची फसवणूक केली जात असल्याचा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा आरोप.**
4. **नागपूरसह विदर्भात जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा.**

**आणि**

5. **कोरियन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अश्मिता चलिहा विजयी.**

**आता सविस्तर बातम्या .......**

छोडो भारत

भारत छोडो आंदोलनाच्या ८४ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी स्वातंत्र्य सैनिकांना आदरांजली वाहिली. महात्मा गांधींच्या करा किंवा मरा या हाकेतून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात देशाला एकवटले. त्यांचं धैर्य, त्याग आणि देशभक्ती पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहील, अशा शब्दात उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी अभिवादन केलं आहे. भारत छोडो आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिवादन केलं. या स्वातंत्र्य सैनिकांचं धैर्य प्रत्येक भारतीयासाठी सदैव प्रेरणा देत राहील, असं ते आपल्या संदेशात म्हणाले आहे. आजच्या ऑगस्ट क्रांती दिनी ज्यांच्या जिद्दीने आणि धैर्यामुळे "भारत छोडो आंदोलन" आणि भारताच्या स्वांतत्र्यलढ्याचा मार्ग बळकट केला, त्या असंख्य स्वातंत्र्य सैनिकांना अभिवादन, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हुतात्म्यांना आदरांजली वाहिली आहे.

भारत छोडो / विदर्भ

भारत छोडो आंदोलन दिनानिमित्त विदर्भात ठिकठिकाणी विविध उपक्रम राबविण्यात आले. यवतमाळच्या उमरी येथील ऐतिहासिक हुतात्मा स्मारकावर पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत स्वातंत्र्य लढ्यातील वीरांना अभिवादन करण्यात आलं. 1942 च्या स्वातंत्र्य चळवळीत  हौतात्म्य पत्कारणाऱ्या यशवंत पाळेकर यांच्यासह स्वातंत्र्य संग्रामात शहीद झालेल्या सेनानींच्या स्मृतिप्रीत्यर्थ उमरी येथे हुतात्मा स्मारक उभारण्यात आलं आहे. यावेळी शहीद कुटुंबियांच्या पाल्यांचा सन्मान करण्यात आला, तसंच वृक्षारोपण आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजिण्यात आले. तर वर्धा इथं "ऑगस्ट क्रांती मॅरेथॉनचं"  आयोजन करण्यात आलं होतं. या मॅरेथॉनच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम विकास भवन इथं पालकमंत्री डॉ. पंकज भोयर,माजी खासदार रामदास तडस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी 'सेवाग्राम' वर्धा ही "चले जाव" चळवळीची वैचारिक भुमी असल्याचं प्रतिपादन भोयर यांनी केलं. या स्पर्धेत शालेय, महाविद्यालयीन तसच खुल्या गटातून ३२५ धावपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

हर घर तिरंगा

देशभरात आजपासून हरघर तिरंगा हे अभियान सुरू झालं आहे.....

**(तिरंगा गीत)**

येत्या १७ तारखेपर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत यंदा "वंदे मातरम" या भारताच्या राष्ट्रीय गीताच्या दीडशेव्या वर्धापन दिनाचंही औचित्य असणार आहे. या निमित्तान देशभरात विविध ठिकाणी वंदे मातरमचं सामूहिक गायन, तिरंगा रॅली, प्रदर्शनं, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. नागपूर शहरातही भाजपचे शहराध्यक्ष दया शंकर तिवारी यांच्या नेतृत्वात आज सायंकाळी सहाही विधानसभा मतदार क्षेत्रातून तिरंगा यात्रा काढण्यात येत आहे. 700 फुटांचा भव्य तिरंगा हे या यात्रेचं प्रमुख आकर्षण आहे. त्यासोबतच विशेष नृत्य पथक तसंच शीख समाजाच्या पारंपारिक युद्ध कलेचे थरारक प्रात्यक्षिक सादर करण्यात येणार आहे. माजी सैनिक आणि एनसीसी कॅडेट्स या यात्रेत सहभागी होत आहेत.

राष्ट्रपती ध्वज सन्मान

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुदुच्चेरी पोलीस दलाला राष्ट्रपती ध्वज प्रदान केला आणि देशाची अंतर्गत सुरक्षा अबाधित राखण्यासाठी या दलाने

दाखवलेल्या समर्पण भावनेचं कौतुक केलं. लष्कराची तुकडी किंवा एखादं राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या पोलीस दलाला दिला जाणारा हा सर्वोच्च सन्मान आहे.

मंडल यात्रा

ईम्पिरिकल डेटाच्या नावाखाली ओबीसींची वास्तविक संख्या कमी दाखवून समाजाची फसवणूक केली जात आहे. ओबीसींची लोकसंख्या सुमारे ६० टक्के असताना ती २८ ते ३० टक्के असल्याचे दाखवणे खपवून घेतले जाणार नाही. ओबीसींना न्याय आणि त्यांचे घटनात्मक हक्क मिळवून देण्यासाठी लढा अधिक तीव्र केला जाईल, असा निर्धार काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. ओबीसी जनजागृतीसाठी काढण्यात आलेल्या मंडल यात्रेचा आज चंद्रपूर इथं समारोप झाला, त्यावेळी ते बोलत होते. ओबीसी समाजाच्या भविष्यासाठी हि यात्रा आम्ही काढल्याचं यावेळी वडेट्टीवार म्हणाले ............

या यात्रेने विदर्भातील गडचिरोली, बल्लारशा, वडसा आणि देसाईगंजसह विविध भागांत ओबीसी हक्कांबाबत जनजागृती केली असल्याचं वडेट्टीवार यांनी सांगितलं.

डॉ.नीलम गोऱ्हे

शिवसेना नेत्या तथा विधान परिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नागपुरात अलीकडेच घडलेल्या मुलीच्या लैंगिक अत्याचार आणि सायबर गुन्हयासंदर्भात, हुडकेश्वर पोलीस ठाण्यास भेट देऊन या घटनेतील तपास आणि पोलिसांकडून करण्यात आलेल्या कारवाईचा आढावा घेतला. या प्रकरणात अनेक लोक गुंतलेले असू शकतात असा संशय व्यक्त करत पोलीस आणि संबंधित सर्व यंत्रणा पीडितेला सर्वोतोपरी सहाय्य करत असल्याचं गोऱ्हे यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं.

जागतिक आदिवासी दिवस

दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन साजरा केला जातो. १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने या दिवसाला मान्यता दिली. जगभरातील आदिवासींचे हक्क, संस्कृती, परंपरा, भाषा आणि सामाजिक-आर्थिक विकासाबाबत जनजागृती करणे तसच त्यांच्या योगदानाचा गौरव करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. “आदिवासी सुईणींचा सन्मान: जीवन आणि आरोग्याचे संरक्षण” हि यंदाच्या

दिनाची संकल्पना आहे. आदिवासी समाज बांधवांनी मोठ्या संख्येन एकत्र येत आज नागपुरात जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा केला. विधानभवन परिसरात गोंड राजे बख्त बुंदेल शाह तसंच आदिवासी गोवारी शहीद स्मारक इथं अभिवादन करण्यासाठी नागपूरसह विविध भागांतून हजारो आदिवासी समाज बांधव एकत्र आले होते. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, आणि जनजागृतीपर उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं. आदिवासी संस्कृतीचे जतन, पारंपरिक चालीरीती आणि मातृभाषेचे संवर्धन, तसच समाजातील हक्क आणि अधिकारांबाबत जनजागृती करणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.गडचिरोली आणि गोंदिया शहरात देखील आज जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी आदिवसी बांधवांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून विविध ठिकाणी पारंपरिक नृत्य सादर करत आपल्या समृद्ध संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडविले.

रानभाजी महोत्सव

सकस आहार प्रत्येकाच्या शरीराची गरज आहे. आरोग्य सुदृढ राहण्यासाठी सकस, शुद्ध आणि चांगले खाद्य शरीरात जाणे आवश्यक आहे. त्यामुळे विशिष्ट कालावधीत उपलब्ध होणाऱ्या आणि नैसर्गिकरित्या तयार होणाऱ्या रानभाज्या प्रत्येकानेच आपल्या आहारातला एक भाग बनविले पाहिजे, असं प्रतिपादन वर्ध्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केलं.वर्धा इथं जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात कृषि विभाग आणि आत्माच्या वतीन आयोजित करण्यात आलेल्या रानभाजी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री बोलत होते.

बापूसाहेब देशमुख

श्री गाडगे महाराज विश्वस्त मंडळाचे प्रमुख विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांचं आज पहाटे हृदय विकाराच्या तीव्र धक्क्यानं निधन झालं. बापूसाहेब देशमुख यांनी संत गाडगेबाबांनी दाखवलेल्या सेवामार्गाला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवला होता. आपलं संपूर्ण आयुष्य सेवा समर्पण आणि मानवतेच्या कार्यासाठी वाहून घेतलं होतं. बापूसाहेबांच्या निधनाने गाडगेबाबांच्या सेवाकार्याची एक समर्पित दीपज्योत हरवल्याची, भावना सर्वत्र व्यक्त केली जात आहे.

बॅडमिंटन - हि स ९.८.२६

भारतीय बॅडमिंटनपटू अश्मिता चालिहाने 'कोरिया मास्टर्स' स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात चीनच्या हान कियान शीचा १४-२१, २१-१४, २१-१४ असा पराभव करून आपले पहिले 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर' विजेतेपद जिंकले. पहिला गेम गमावल्यानंतर अश्मिताने जोरदार पुनरागमन करत अविस्मरणीय विजय मिळवला. या विजयासह, 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर सुपर ३००' किंवा त्याहून उच्च दर्जाचे विजेतेपद जिंकणारी ती पाचवी भारतीय महिला ठरली.

हवामान

हवामान! आज गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्याला मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. येत्या काही तासांत नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा इथं काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ तसच हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागान वर्तवली आहे. दरम्यान, आज नागपुरात दिवसभर अधून-मधून अत्यंत हलक्या सरी कोसळत होत्या.

आरक्षण संवर्धन परिषद

'अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व जाती-समूहांनी एकसंघ राहावे, हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते. मात्र, ५९ जातींना अंधारात ठेवून उपवर्गीकरणाचा घाट घातला जात असेल, तर तो आम्ही कदापि सहन करणार नाही. अनुसूचित जातींची एकता कायम राहावी हेच आमचे ध्येय आहे' असं प्रतिपादन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांनी केलं. काल नागपुरात डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीन आयोजित राष्ट्रीय आरक्षण संवर्धन परिषदेत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

*****